**कंत्राटी / तात्पुरत्या / हंगामी सेवेतील कर्मचा-यांचे पारिश्रमिक / मानधन आहरित करण्याबाबत तात्पुरती व्यवस्था**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२२/कोषा प्रशा-४**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक: १६ एप्रिल, २०२०.**

**शासन परिपत्रक:-**

**वाचा:- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२२/कोषा प्रशा-४, दि.२९.०१.२०२०**

शासकीय सेवेतील स्थायी व अस्थायी पदांवरील रिक्त जागांवर कंत्राटी / तात्पुरत्या / हंगामी स्वरुपात नियुक्त कर्मचा-यांचे मानधन / पारिश्रमिक इत्यादी देयके "०१-वेतन" या उद्दिष्ट शीर्षातून सेवार्थ प्रणालीद्वारे संस्करीत करण्यात येत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली होती. त्यास अनुसरुन कंत्राटी / तात्पुरत्या / हंगामी तत्वावर कार्यरत कर्मचा-यांच्या मानधन / पारिश्रमिक यासाठीची तरतूद "१०-कंत्राटी सेवा" या उद्दिष्ट शीर्षातंर्गत आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात करुन घेण्याबाबतच्या सूचना उपरोक्त वाचा येथील शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या.

२. तथापि, अनेक विभागाकडून पारिश्रमिक / मानधन इत्यादी देयके प्रदान करण्यासाठी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अनुदानाची तरतूद "१०-कंत्राटी सेवा" या उद्दिष्ट शीर्षातंर्गत करणे शक्य झाले नसल्याची बाब त्यांनी वित्त विभागाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

३. याबाबत सर्व विभागांना सूचित करण्यात येते की, ज्या कार्यालयांकडे "१० - कंत्राटी सेवा" हे उद्दिष्ट शीर्ष उपलब्ध नाही त्या कार्यालयांनी मानधन / पारिश्रमिकाचा खर्च तात्पुरत्या स्वरुपात "१३ - कार्यालयीन खर्च" या उद्दिष्ट शीर्षातंर्गत उपलब्ध अनुदानातून करावा. तसेच "१० - कंत्राटी सेवा" हे उद्दिष्ट शीर्ष उपलब्ध आहे, मात्र त्यामध्ये पुरेशी तरतूद उपलब्ध नाही अशा कार्यालयांनी गरजेनुसार निधी पुनर्वितरण करुन त्यामधून मानधन / पारिश्रमिकाचा खर्च भागवावा.

४. केवळ तात्पुरती व्यवस्था म्हणून कंत्राटी / तात्पुरत्या / हंगामी सेवेतील कर्मचा-यांचे मानधन / पारिश्रमिक आहरित करण्याबाबत उपरोक्त नमूद प्रमाणे कार्यवाही करण्यास केवळ दि. ३१ जुलै, २०२० पर्यंत मान्यता राहील.

५. सर्व संबंधित विभागांनी विधीमंडळाच्या पुढील अधिवेशनामध्ये कंत्राटी / तात्पुरत्या / हंगामी सेवेतील कर्मचा-यांचे मानधन / पारिश्रमिक यासाठी "१० -कंत्राटी सेवा" या उद्दिष्ट शीर्षातंर्गत आवश्यक तरतूद पुरवणी मागणीद्वारे करुन घ्यावी.

६. सदर शासन परिपत्रक हस्त स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( इंद्रजित गोरे )
शासनाचे उप सचिव

**प्रत-**

१. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव.
४. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
५. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
६. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर.
१४. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२.
१५. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१.
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई.
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२२. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदर, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.